कर्मचारीवर्ग खाते.
परिपत्रक क्र. १५/१९९४.

क्र. राप/आस्था/ २०१-ई/५२५०
म. रा. मा. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई–४०० ००८. दिनांक : ३१. ८. १९९४

आवक क्रमांक 1218
दिनांक 2-9-94

प्रादेशिक व्यवस्थापक,
रा. प. महामंडळ, मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/नागपूर/अमरावती.

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर विभाग

विषय : घटक संवर्ग पदांतील कर्मचाऱ्यांच्या आंतर–प्रादेशिक विनंती बदल्या --

.. ..

DPO
all staff to note

तृतीयवर्ग घटक संवर्ग व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या आंतर प्रादेशिक विनंती बदल्या मध्यवर्ती कचेरी मार्फत केल्या जातात. परंतु आता असे ठरविण्यात आले आहे की, यापुढे या पदांतील कर्मचाऱ्यांच्या बदल्या संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक/कार्यशाळा व्यवस्थापक खालील तत्त्वांनी विचारात घेऊन करतील.

[१] बदली मागणाऱ्या कर्मचाऱ्यांचे अर्ज प्रादेशिक पातळीवर ज्येष्ठतेनुसार विचारात घेतले जातील. त्याकरिता सोबत अर्जाचा नमुना देत आहोत. प्रादेशिक कचेरीत/मध्यवर्ती कार्यशाळेत बाहेरून येणारी जनरल डाक नोंद करून घेण्यासाठी जे आवक [इनवर्ड] रजिस्टर असेल त्यातील आवक नोंदणी अर्जाचा ज्येष्ठता क्रम ठरविण्यासाठी विचारात घ्यावा. कचेरीत आलेले अर्ज आवक नोंद वहीमध्ये नोंद करूनच दप्तरी ठेवावे. तसेच सदरच्या अर्जावर आवक क्रमांक व तारीख याची नोंद घ्यावी. एकाच दिवशी एकाच प्रकारातील एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास नेमणुकीची तारीख ज्येष्ठतेकरीता विचारात घ्यावी.

[२] प्रत्येक प्रवर्गातील विनंती बदली अर्जाची नोंद घेण्याकरिता रजिस्टर सोबत दिलेल्या नमुन्यात ठेवण्यात यावे. यांशिवाय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांनी धारण केलेला ग्रेड देखिल लिहावा.

[३] ज्या कर्मचाऱ्याची बदली ज्येष्ठतेनुसार करावयाची आहे तो नियमित वेतनश्रेणीवर असावा आणि त्याची संबंधित विभागात कमीत कमी पाच वर्षांची अखंड सेवा झालेली असावी.

[४] ज्या कर्मचाऱ्याची बदली करावयाची आहे त्याचेवर कोणतेही अपराध प्रकरण अनिर्णित नसावे. तसेच तो बदली करताना कोणत्याही प्रकारच्या अपराध प्रकरणात गोवलेला नसावा. त्यांनी केलेल्या सेवेचा कालावधी समाधानकारक असावा. त्याची नोकरीतील हजेरी देखिल समाधानकारक असावी. तसेच त्याचा बेकायदेशीर उद्योगात सहभाग नसावा.

[५] त्यांनी बदलीसाठी अर्जात दिलेल्या कारणांची शहानिशा करून आवश्यकता योग्य त्या माध्यमातून करून घ्यावी.

[६] ज्या प्रदेशात / विभागात / मध्यवर्ती कार्यशाळेत बदली करावयाची आहे त्या ठिकाणी नियमित रिक्त जागा असली पाहिजे [या करिता एकूण पदांची मंजुरी आणि त्यानुसार रिक्त जागा याची खात्री करून घ्यावी.]. न्यायालयातून/अपिलातून नेमणुकीसाठी प्रकरणे आहेत किंवा कसे याची शहानिशा करून खात्री करून घ्यावी.

[७] विनंतीवरून होणाऱ्या बदल्या हया थेट भरतीद्वारे भरण्यात येणाऱ्या रिक्त पदी करावयाच्या असल्याने संबंधित पदांतील भरतीचे प्रमाण [कोटा] तसेच मागासवर्गीयांसाठीची पदे भरण्यासाठी ठेवण्यात आलेली १०० बिंदू नामावली [रोस्टर] विचारात घेऊन

...२